


पान 3

महासागर

अमरावती

मंगळवार दि. 17 सप्टेंबर 2024


# तरुणाची 78 हजारांची फसवणूक

**चांदूर रेल्वे, ( दि.16 )**-क्रेडिट कार्ड ब्लॉक करण्याच्या नावाखाली चांदूर रेल्वेच्या खडकपुरा येथील 44 वर्षीय तरुणाची 78 हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना 29 जुलै ते 2 ऑगस्ट दरम्यान घडली. याप्रकरणी अर्पण अनिल बिस्वास यांनी 15 सप्टेंबर रोजी चांदूर रेल्वे पोलिसांत तक्रार केली होती. खडकपुरा येथील रहिवासी अर्पण बिस्वास यांचे बँक खाते चांदूर रेल्वेच्या मिलिंद नगर येथील एसबीआय बँकेच्या शाखेत आहे. अर्पण बिस्वास यांना त्यांच्या खात्यातून 5 रुपये कापल्याचा मेसेज आला. अर्पणने बँकेत जाऊन चौकशी केली असता बँक अधिकार्याने मी तुमचे क्रेडिट कार्ड ब्लॉक करतो, असे सांगितले. काही वेळाने अर्पणच्या मोबाईलवर एका अनोळखी महिलेचा फोन आला. तिने अर्पणला सांगितले की, मी क्रेडिट कार्ड विभागातून फोन करत आहे, तुमच्या क्रेडिट कार्डमधून पैसे कापले गेले आहेत, ते बंद करण्यासाठी मला तुमचे क्रेडिट कार्ड डिटेल्स द्या अर्पणला वाटले की, बँकेत अर्ज केल्यामुळे फोन आला असेल, म्हणून त्याने ते दिले. त्या महिलेला कार्ड तपशील मिळाल्यानंतर पुन्हा अर्पणच्या बँक खात्यातून 5 रुपये कापण्यात आले, त्यानंतर क्रेडिट कार्डमधून 28 हजार 462 आणि 49 हजार 606 रुपये असे एकूण 78 हजार 73 रुपये अज्ञात आरोपींनी काढले.

# जाऊ नका तुम्ही गावाला, चैन पडेना आम्हाला!



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.16 ) - ज्या गणरायाच्या आगमनाने संपुर्ण आसमंतात चैतन्य आणि उत्साह संचारला होता त्या लाडक्या बाप्पा निरोप देण्याची वेळ आल्याने आता 'जाऊ नका तुम्ही गावाला, चैन पडेना आम्हाला' असे म्हणण्याची वेळ आली आहे. सोमवार 17 सप्टेंबरपासून गणेश मुर्तीचे विसर्जन सुरु होणार आहे. गणेश विसर्जनासाठी शहर आणि ग्रामिण पोलिसांनी चोख बंदोबस्ताचे नियोजन केले आहे, ठिकठिकाणी पोलिसांचा खडा पहारा राहणार आहे.**

## आजपासून गणेश विसर्जन

जिल्ह्यातील ग्रामीण भागातिल 91 सार्वजनिक गणेश मंडळांतील गणेश मूर्त्यांचे विसर्जन झाले. मंगळवार, 17 सप्टेंबर रोजी शहरातील 76, तर ग्रामीण भागातील 476 अशा एकूण 552 मूर्तींचे विसर्जन होणार आहे. त्याचप्रमाणे 18 सप्टेंबर रोजी शहरातील 157 आणि ग्रामीण भागातील 386 अशा 543 मूर्तींचे विसर्जन होणार असून 19 सप्टेंबर रोजी शहरातील 50 आणि ग्रामीण भागातील 244 अशा एकूण 294 मूर्तीचे विसर्जन होणार आहे.

## विदर्भाच्या राजाची मिरवणूक 23 ला

शहरातील इर्विन चौकातील विदर्भाच्या राजाच्या विसर्जन मिरवणुक 23 सप्टेंबर रोजी निघणार आहे. यासाठी शहरात भव्यदिव्य अशी तयारी करण्यात आली आहे. यासोबतच जिल्ह्यातील गणेश विसर्जन सोहळा 24 सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

## वाहतूकीमध्ये केला बदल

दस्तुर नगर ते छत्री तलाव मार्ग (गणेश विसर्जनाकरिता येणार वाहन व परिसरातील नागरिक वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी) वाहनांना प्रवेशासाठी बंद आहे. यासाठी पर्यायी मार्ग म्हणून दस्तुर नगर मार्गे भानखेडाकडे जाणार्या वाहनांनी पर्यायी मार्ग कोंडेश्वर टी पॉईट, भानखेडा बु. किंवा चपराशी पुरा ते पोहरा मार्गे, भानखेड ते दस्तुर नगर मार्ग (गणेश विसर्जनाकरिता येणार वाहन वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी) पर्यायी मार्ग- कोंडश्वर मार्गे किंवा पोहरा मार्गे वाहतुकीसाठी राहणार आहे.

## छत्री तलाव, वडाळी तलाव, कुत्रिम तलावावर व्यवस्था

घरगुती गणपती मूर्तीच्या विसर्जनासाठी महापालिका आणि पोलिस प्रशासनानेही व्यापक विसर्जन नियोजन केले आहे. त्याअंतर्गत शहरात छत्री तलाव आणि प्रथमेश तलाव (वडाळी) या 35 हजार श्रीमूर्तीची क्षमता असलेले दोन कृत्रिम तलाव तयार करण्यात आले आहेत. विसर्जन स्थळांवर सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि सीसीटीव्ही पाळत ठेवण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शहरातील विविध प्रभाग आणि चौकाचौकात अशा एकूण 25 ठिकाणी रबर टाक्यांमध्ये विसर्जनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. दस्तुर नगर कडुन छत्री तलाव कडे जाणा-या मार्गावर एक्सप्रेस हायवेवरील उडाणपुलाच्या अलीकडे (श्रीराम मंदीराच्या मागील बाजुस खुले मैदान), छत्री तलाव एक्सप्रेस हायवे उडाणपुल पलीकडील दोन्ही बाजु (मंगलधाम/महादेवखोरी रोड व खोडके कॉलेज गेट पर्यंत), छत्री तलावचे समोरील बाजु तसेच गोयंका लॉन मागे मालु लेआउट येथील खाली जागेत, छत्री तलाव लगत भानखेड कडे जाणा-या रोड लगत खुली जागेवर वाहनांकरिता पार्कींग व्यवस्था करण्यात आली आहे.

## जड वाहनांना शहरात प्रवेशबंदी

गणेश विसर्जनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्ननिर्माण होवु नये. याकरिता 17 सप्टेंबर सकाळी 6 वाजता पासुन रात्री 12 वाजेपर्यंत शहरात सर्व प्रकारच्या जड वाहनांना (407 व त्यापेक्षा सर्व जड वाहन) प्रवेश बंदी राहणार आहे. तरी सर्व जडवाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, कोणीही या दरम्यान जड वाहनासह शहरात प्रवेश करु नये, असे आवाहन करण्यात आले आहे. छत्री तलाव विसर्जन स्थळी मोठ्या संख्येने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व परिसरातील घरगुती गणपतीचे विसर्जन होणार आहे. त्यामुळे वाहतुक कोंडीच्या अनुषंगाने काही मार्गात अशत: बदल केले आहे.

## असा राहील ग्रामीणमध्ये पोलीस बंदोबस्त

शहर व जिल्हा पोलिस प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामिण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या नेतृत्वाखाली, सहायक पोलिस अधीक्षक, 5 डीएसपी, 25 ठानेदार, 61 दुय्यम ठानेदार, 71 पोलिस निरीक्षक, 1600 पोलिस कर्मचारी, 800 होमगार्ड, आरसीपी-क्यूआरटी-एसआरपीएफची प्रत्येकी एक कंपनी आणि शहरात पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली 3 पोलिस उपायुक्त, 5 सहायक पोलिस आयुक्त, 25 पोलिस निरीक्षक, 1300 पोलिस, 12 सीआर व्हॅन, 7 दामिनी पथक आणि प्रत्येकी एक कंपनी, आरसीपी-क्यूआरटी-एसआरपीएफची प्रत्येकी एक कंपनी असा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहर व जिल्ह्यातील संवेदनशील भागातही चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# राज्यपाल पदाचं आश्वासन, पण महामंडळच मिळाले

## आनंदराव अडसूळांची कॅबिनेट दर्जाच्या पदावर वर्णी

**अमरावती** - नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये बंडखोरी टाळण्याकरिता शिवसेना नेते आणि माजी खासदार आनंदराव अडसूळ यांना राज्यपाल पदाचे आश्वासन देण्यात आले होते. परंतू आश्वासन पुर्ण न झाल्याने आक्रमक झालेल्या अडसूळांना राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी (कॅबिनेट मंत्री दर्जा) नियुक्ती करत शांत करण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आनंदराव अडसूळ यांना राज्यपाल पदाचा शब्द दिला होता. महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगावर अध्यक्ष व 3 सदस्य पदांवर खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये, अध्यक्षपदी शिवसेना नेते आनंदराव अडसूळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी खासदार आनंदराव अडसूळ यांना



अध्यक्ष, नागपूर येथील धर्मपाल मेश्राम यांना उपाध्यक्ष तथा सदस्य सदस्य, पिंपरी, पुणे येथील गोरक्षक लोसाडे व पालघर येथील वैदेही वाढाण यांना सदस्य पद देण्यात आले.

## उस्मान नगरमध्ये हत्येचा प्रयत्न

**अमरावती** - किरकोळ वादातून चाकू हल्ला करीत एका तरुणाचा हत्येचा प्रयत्न केल्याची घटना नागपुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उस्मान नगर येथे घडली आहे. या हल्ल्यात पिता-पुत्र जखमी झाले आहेत. ही घटना 14 सप्टेंबर रोजी रात्री 9.30 वाजता घडली. जखमी शेख तौफिक शेख मुस्ताक यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# चांदणी चौक परिसरात हवेत गोळीबार


## दोन गट भिडले

या वादात देशी बनावटीच्या पिस्तुलातून हवेत गोळीबार देखील करण्यात आला. त्यामुळे परिसरात प्रचंड दहशत पसरली. या घटनेच्या माहितीवरून नागपुरी गेट पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. ही घटना रविवारी दुपारी चार वाजता ही घटना घडली. चांदणी चौकातील रहिवासी शेख समीर यांचे अब्दुल तालिब यांच्याकडे काही व्यावसायिक व्यवहारासाठी पैसे होते. रविवारी दुपारी चार वाजता अब्दुल तालिब हे पैसे मागण्यासाठी त्यांच्या 10 ते 15 समर्थकांसह चांदणी चौकात पोहोचले. त्यानंतर त्यांच्यातील वाद सुरु झाला. यावेळी शेख समीरचा भाऊ मोनू हा त्याच्या समर्थकांसह तेथे पोहोचला, काही वेळातच दोन गटात हाणामारी झाली. ज्यामध्ये कोणीतरी अब्दुल तालिब यांच्या डोक्यावर लोखंडी पाईपने वार केले. यावेळी हवेत बंदुकीतून गोळ्या झाडण्यात आल्या. या संघर्षात दोन्ही बाजूंनी दगडफेकही झाली. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## तरुणावर लोखंडी रॉडने हल्ला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.16 )** - जुन्या पैशांच्या व्यवहारातून काही जणांनी एका घरात शिरून साहित्यांची तोडफोड केली आणि एका तरुणावर लोखंडी रॉडने हल्ला करून बंदुकीच्या गोळ्या हवेत झाडल्याचा प्रकार नागपूरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चांदणी चौक परिसरातील प्यारेवाले हाऊसजवळ 15 सप्टेंबर रोजी सायंकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. याप्रकरणात एका महिलेच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी आरोपी अब्दुल जहिर ऊर्फ काल्या अब्दुल मजीद (63, रा. पठाणपुरा), साजिद अब्दुल दहिर (34), तालीब अब्दुल जाहिर (30), जावेद अब्दुल जहिर, अब्दुल आवेजज ऊर्फ एमडी अब्दुल लतीफ



यांच्यासह दहा ते पंधरा इसमांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. महिलेच्या तक्रारीनुसार, महिलेचा मोठा भाऊ समिर याच्यासोबत आरोपींचा जुना व्यवहार होता. त्या कारणावरून आरोपी अब्दुल साजीद अब्दुल जहिर याने वाद घालून गैरकायद्याची मंडळी जमवली आणि महिलेच्या घरात शिरून साहित्यांची तोडफोड केली. तसेच महिलेचा भाऊ शेख फैसल ऊर्फ सोनु शेख अशरफ (24) याला जीवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर लोखंडी रॉड मारण्यात आले. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले. तसेच आरोपींनी फिर्यादी महिलेला हाताबुक्यांनी मारहाण करून हवेत अग्निशस्त्राचा वापर केला, असे महिलेने तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलिसांनी आरोपींविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

# 'महाविकास' च नव्हे 'महायुती' तही चढाओढ

## पक्षाकडे लॉबिंग आणि गाठीभेटीचा धडाका



## दोन माजी आमदार दर्यापुर विधानसभा निवडणूक लढण्याची तयारी

**अनंता मोहोड**

**अंजनगाव सूर्जी, ( दि.16 )** - आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने सर्वच पक्ष्यांच्या नेत्यांनी तयारी सुरू केली आहे. दर्यापूर विधानसभा मतदारसंघांमध्ये सर्वसामान्या पर्यंत पोहोचण्याचा आणि भेटीगाठीचा टप्पा धडाक्यात सुरू झाला आहे. दर्यापुर मतदार संघ हा 1989 पासून ते 2006 पर्यंत शिवसेनेशी निगडीत असणारा आणि शिवसेनेचा गड म्हणुन ओळखला जाणारा मतदार संघ. या मतदार संघावर प्रकाश भारसाकळे यांचे सन 2009 पर्यंत निर्विवाद वर्चस्व होते (काँग्रेस मध्ये प्रवेश केल्यानंतरही) परंतू 2009 ला हा मतदार संघ अनू जातीसाठी आरक्षित झाला आणि कॅ.अभिजीत अडसूड हे शिवसेनेचे आमदार झाले. त्यानंतर शिवसेनेच्या या बालेकिल्ल्याला भाजपचे रमेश बुंदिले यांनी 2014 च्या निवडणुकीत पहिल्यांदा खिंडार पाडली. मात्र 2019 च्या निवडणुकीत भाजपला जागा राखता आली नाही. विद्यमान खासदार बळवंत वानखडे हे काँग्रेसचे आमदार म्हणुन निवडून आले. दर्यापूर मतदारसंघ हा शिवसेनेचा गड समजला जातो, परंतु आता राजकीय परिस्थिती पाहता चित्र वेगळे राहणार आहे. दरम्यान राज्यात राजकीय बंड झाले. शिवसेना आणि राष्ट्रवादीचे प्रत्येकी दोन गट निर्माण झाले. यामध्ये शिंदे गट आणि अजित पवार गट महायुतीचे घटक पक्ष आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व शिवसेना (उबाठा) व काँग्रेस यांची महाविकास आघाडी आहे. हा मतदार संघ अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. त्यामुळे महाविकास आघाडी मधील काँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस गट, शिवसेना (उबाठा) मधील नेते आणि महायुतीतील भाजप, शिवसेना शिंदे गटातील नेते निवडणूक लढविण्यास इच्छुक दिसत आहे. या मतदारसंघात प्रहार ही आपला उमेदवार देण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणूकीत या मतदारसंघात तिरंगी लढत होणार असल्याचे दिसत आहे. महायूतीकडून माजी आमदार रमेश बुंदिले भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढण्यात तयारी दर्शवली आहे. तसेच सामजिक कार्यकर्ते अविनाश गायगोलेही भाजप कडून निवडणुक लढण्यास इच्छुक आहे. माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसूळ यांची शिवसेना (शिंदे गट) कडून उमेदवारी निश्चित झाल्याचा दावा शिवसेनेचे कार्यकर्ते यांच्याकडून करण्यात येत आहे. महाविकास आघाडी मधील शिवसेना (उबाठा) कडून समाजातील समस्या सोडण्यात नेहमी तत्पर असणारे गजानन लवटे पक्षाकडे लॉबिंग करतांना दिसून येत आहे. हा मतदारसंघ शिवसेना (उबाठा) सुटला तर मला तिकीट भेटणार असा प्रतिदावा विक्रम पारडे करताना दिसत आहे. दर्यापूर मतदारसंघात काँग्रेस इच्छुक नेत्यांचीसुद्धा गर्दी वाढताना दिसत आहे. शासकीय सेवेचा 26 वर्षाचा अनुभव व नगराध्यक्ष पदाचा प्रदीर्घ अनुभव असणारे अरुण वानखडे व गुणवंत देवपारे हे मतदारसंघात गाठीभेटी घेताना व काँग्रेस पक्षाकडे लॉबिंग करताना दिसत आहेत. दुसरीकडे नवनिर्वाचित खासदार बळवंत वानखडे यांचे पुतणे नितेश वानखडे हे मतदारसंघात सक्रिय होताना दिसत आहे. जनतेच्या सतत संपर्कात असणारे व निवृत्त शासकीय सेवेतील अधिकारी सुधाकर तलवारे हे दर्यापूर विधानसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक आहे. तलवारे हे 2009 पासून काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी मागत आहे. त्यामुळे त्यांनाही यावेळी उमेदवारी मिळणार अशी अपेक्षा आहे. एवढेच नव्हे तर शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेत्यांनी सुद्धा आपल्या पक्षश्रेष्ठीकडे हा मतदारसंघ राष्ट्रवादीसाठी सुटावा अशी मागणी केली आहे. एवढेच नव्हे लोकसभा निवडणुकीमध्ये दिनेश बुब यांना मिळालेली मतांची लीड पाहता प्रहार पक्ष सुद्धा दर्यापूर मतदारसंघात आपला उमेदवार देणार अशी चर्चा सुरू आहे, परंतू कुठल्याच पक्षाने अजूनपर्यंत उमेदवारावर शिक्कामोर्तब केले नसल्याने ईच्छुकांच्या मुंबई वाऱ्या सुरु आहे.

## बॅनरबाजीला उधाण

गेल्या दोन महिण्यांपासून संपुर्ण मतदार संघात बॅनर बाजीला उधान आले आहे. त्यामुळे येणारे काही दिवस इच्छुकांचे कसब पणाला लागणार आहे. कोणता पक्ष आणि कोणता उमेदवार सरस ठरेल हे येणारा काळच ठरवेल.

## असे आहे इच्छूक उमेदवारी

सुधाकर तलवारे, अरुण वानखडे, गजानन लवटे , कॅप्टन अभिजीत अडसूळ, रमेश बुंदिले, अविनाश गायगोले,, नितेश वानखडे, विक्रम पारडे

# पूर्णा घाट गणेश मूर्ती विसर्जन साठी सज्ज



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.16 )**- अमरावती आणि अकोला जिल्ह्याच्या सिमेवर असलेल्या लाखपूरी येथील पूर्णा नदी घाट गणेश मुर्ती विसर्जनाकरिता सज्ज करण्यात आला आहे. नदीच्या पात्रामध्ये दरवर्षीप्रमाणे मोठ्या मूर्तींचे लाखपुरी पुलावर विसर्जन होत असते.

मुर्तीजापूरचे आमदार हरिष पिंपळे तथा ठाणेदार गुठ्ठे यांनी तयारीचा आढावा घेतला. तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा गणेश मूर्ती विसर्जन सोहळा सोमवार दि. 16 ते 19 सप्टेंबर 2024 ला. पार पडणार आहे. या ठिकाणी मुर्तीजापुर शहर, मूर्तिजापूर ग्रामीण, माना, दर्यापूर, अंजनगाव, बोरगाव मंजू पोलीस स्टेशन अंतर्गत शेकडो मंडळाच्या मोठ्या मुर्ती व घरगुती गणेश मूर्तीचे विसर्जन होणार आहे. या ठिकाणी संपुर्ण व्यवस्था करण्यात आली आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

पान 6

महासागर अमरावती

मंगलवार दि. 17 सप्टेंबर 2024



# अचलपूर नगर परिषदेच्या कर विभागाला भीषण आग

**महत्त्वाचे दस्तावेज व संगणक जळून खाक**



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि.16 )–** अचलपूर नगर परिषदेच्या कर विभागात 15 सप्टेंबर रोजी दुपारी 4 वाजता अचानक आग लागल्याने खळबळ उडाली. ही आग नगर परिषद कार्यालयाच्या मुख्य इमारतीच्या मागील कर विभागाच्या वरच्या भागात लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले आणि जवळपास एक तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आणण्यात यश आले. या आगीत विभागातील महत्त्वाचे दस्तावेज आणि संगणक जळून खाक झाले, ज्यामुळे मालमत्ता नोंदणीशी संबंधित फाइलांचे मोठे नुकसान झाले आहे.

रविवारी सुट्टी असल्याने कार्यालयात कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नव्हते. मात्र, घटनेच्या वेळी स्वच्छता गृहाजवळ आलेल्या एका व्यक्तीने इमारतीतून धूर निघताना पाहिले आणि त्याने तत्काळ अग्निशमन विभागाला कळविले. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि आग विझवण्यास सुरुवात केली.

घटनास्थळी नगर परिषद बांधकाम अभियंता अरविंद गोठवाल, अग्निशमन अधिकारी अनुराग संदेश जोगदंड, कर विभागाचे अधिकारी व अन्य कर्मचारी उपस्थित होते. या आगीत मालमत्ता नोंदणीसंबंधी महत्त्वाचे दस्तावेज, फाइल्स आणि संगणक जळून खाक झाले, ज्यामुळे या विभागाच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे.




### आगीचे कारण अस्पष्ट

आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. मात्र प्राथमिक तपासणीत असा अंदाज वर्तविला जात आहे की, ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी. यासंदर्भात अधिकृत तपासणी सुरू आहे आणि लवकरच तपशीलवार अहवाल प्राप्त होण्याची शक्यता आहे.

### 1992 च्या आगीची आठवण ताजी

या घटनेने 1992 साली अचलपूर नगर परिषदेच्या इमारतीला लागलेल्या भीषण आगीची आठवण ताजी झाली आहे. त्या वेळीही नगर परिषदेस मोठे नुकसान सहन करावे लागले होते आणि महत्त्वाचे दस्तावेज नष्ट झाले होते. या आगीत अनेक महत्त्वपूर्ण मालमत्ता नोंदणी दस्तावेज जळून नष्ट झाले आहेत. नगर परिषद प्रशासन आता नुकसान भरपाई करण्याचे आणि कामकाज सुरळीत करण्याचे प्रयत्न करत आहे.

# जिल्ह्यात लेझर लाईटवर बंदी

## गणेश विसर्जन, ईद ए मिलादच्या पार्श्वभूमिवर अधिसुचना जारी

## दुर्घटना टाळण्यासाठी निर्णय



## पोलीस अधीक्षकांचे आदेश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )–** गणेश विसर्जन मिरवणुक व ईद ए मिलादच्या जुलूसावेळी ध्वनिक्षेपकावर लावण्यात येणाऱ्या लेझर बीम लाइटवर पोलिसांनी बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. कोणी लेझर बीम लाइट लावल्यास, कायदेशीर कारवाई करण्यात येईल,' असा इशारा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम-163(1) अन्वये) तशी अधिसुचनाच त्यांनी पारित केली आहे.

जिल्हयात सार्वजनिक गणेश मंडळांकडून वेगवेगळ्या तारखेला मोठया प्रमाणात विसर्जन मिरवणुकांचे आयोजन केले जात आहे. या मिरवणुकीमध्ये लेझर लाईटचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. यावर्षी कोल्हापुर जिल्हयातील उचगाव परिसरात मणेरमळा येथे गणेश आगमनावेळी मिरवणूक बघण्याकरीता आलेल्या भाविकांच्या डोळयावर लेझर लाईट पडल्याने त्या व्यक्तीच्या डोळयाचा पडदा तसेच बुबुळाला ईजा झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापुर्वी गतवर्षी यवतमाळ जिल्ह्यात उमरखेड येथे ईद-ए-मिलाद मिरवणुकीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे असलेल्या नगर परिषद व्यापारी संकुलाच्या इमारतीच्या मध्यभागी शिवराजमुद्रा व शिवाजी महाराज यांचे अर्धपुतळयावर डीजेवरुन लेझरच्या सहाय्याने मिनार व मशिदीचे चित्र तयार करुन हिंदु धर्माच्या धार्मिक भावना दुखावून जातीय तेढ निर्माण होईल, अशी क्लिप सोशल मिडीयावर व्हायरल झाल्याने तेथे तणावपुर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. त्याअनुषंगाने एसपी विशाल आनंद यांनी लेझर लाईटवर बंदी घातली आहे.

### 21 सप्टेंबरपर्यंत प्रतिबंध

जिल्हयात 21 सप्टेंबरपर्यंत गणेश विसर्जन होणार आहे. तर, 16 ते 21 सप्टेंबर या कालावधीमध्ये ईद ए मिलाद सण मोठया उत्साहाने साजरा केला जातो. त्या दरम्यान सार्वजनिक गणेश मंडळाकडून व ईद ए मिलाद कमिटीकडुन मोठया प्रमाणात मिरवणुकांचे आयोजन केल्या जाते. या मिरवणुकांमध्ये लेझर लाईटचा वापर ते मोठया प्रमाणात करीत आहेत. त्यामुळे मिरवणुकीमध्ये लेझर लाईट वापरास प्रतिबंध करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करत भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 वे कलम 163(1) नुसार जिल्हयात 16 ते 21 सप्टेंबर या कालावधीत लेझर लाईटवर प्रतिबंध घालण्यात आला आहे.

16 ते 21 सप्टेंबर या कालावधीत गणेश उत्सव व ईद ए मिलाद मिरवणुकीमध्ये लेझर लाईटच्या वापरास प्रतिबंध करण्यात येत आहे. या आदेशाचे उल्लंघन करणा-या व्यक्ती फौजदारी कारवाईस पात्र राहतील. तशी अधिसुचना रविवारी काढण्यात आली आहे.



**विशाल आनंद,**
**पोलीस अधीक्षक**



दर्यापूर- येथील नाना माहुरे यांचे कडील गणेश दर्शन.

# सोयाबीन पिकावर 'यलो मोझॅक' रोगाचा प्रादुर्भाव

## उत्पन्नात घट होण्याची भीती



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.16 )** – संततधार पावसामुळे सोयाबीनचे पीक संकटात आले आहे. 'येलो मोझॅक व्हायरस' मुळे ऐन शेंगधरणीच्या काळात सोयाबीनची झाडे पिवळी पडून वाळत आहे.

गेल्या काही वर्षांपासून संकटाचा सामना करणारे शेतकरी येलो मोझॅकच्या आक्रमणामुळे पुन्हा संकटात सापडले आहे. या कीडीमुळे सोयाबीनच्या उत्पन्नात मोठी घट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

यंदा सोयाबीन पिकावर 'यलो मोझॅक' या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. दरवर्षी अंजनगाव बारी परिसरात सोयबीन पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मात्र, यावर्षी पावसाने सुरूवातीला मोठी दांडी मारल्यामुळे सोयबीनचे मोठे नुकसान झाले आहे. कमी पावसातही शेतकऱ्यांनी कसेबसे सोयाबीन पीक जगवले. त्यावरही आता मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांना विविध कंपनीची महागडी औषधाची फवारणी करावी लागत आहे.

ग्रामीण भाषेत ज्याला हळद्या रोग संबोधतात अश्या येलो मोझॅकचा प्रादुर्भाव झाल्याने अंजनगाव बारीसह परिसरातील पार्डी ( देवी), सातरगांव, अऱ्हाड-कुऱ्हाड, उतखेड, वडगाव जिरे, अडगाव (बु.), माजरी म्हसला, सावनेर, खिरसाना, निरसाना, टिमटाळा, निंभोरा (लाहे), मोगरा, भानखेड, पोहरा, हातला, इंदला, वडद, गोविंदपूर इत्यादी गावातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

### येलो मोझॅकचा असा होतो परिणाम

येलो मोझॅक रोगामूळे रोगग्रस्त झाडांवरील शेंगांची संख्या कमी होऊन त्यात लहान आकाराचे दाणे भरतात किंवा संपूर्ण शेंगा दाणेविरहित व पोचट उपजतात आणि पर्यायाने उत्पादनात लक्षणीय घट येते.शेतकऱ्यांचे आर्थिक गणित अवलंबून असलेल्या पिकावर एकामागोमाग एक संकटे येत असल्याने येथील शेतकरी चिंतेत आहेत. आता तरी कृषी विभागाने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच झालेल्या नुकसानीची पाहणी (पंचनामे) करून मोबदला द्यावा, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे.

विमा कंपनीने तक्रार नाकारली सोयाबीनवर आता मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने मी दोन वेगवेगळ्या औषधांची फवारणी केली आहे. मात्र रिझल्ट आला नाही, सोयाबीन खराब झाल्याची तक्रार मी पीक विमा कंपनीकडे केली. मात्र, पीक विमा कंपनीने पिकांचे पंचनामे न केल्याने माझी तक्रार मंजूर नाकारली आहे. आता तरी शासनाने या गोष्टीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज.

**– रामदास अंबडकार,**
**शेतकरी, अंजनगाव बारी.**

शेतकऱ्यांना भरपाई द्यावी माझ्याकडे दोन एकर सोयबीन पीक आहे. मात्र, मागील दहा दिवसांपासून सोयाबीन पिवळी पडत आहे, याचा फटका शेंगा लागण्यावर होत आहे. आधीच पावसाअभावी सोयाबीन करपून गेले आहे. त्यात आता मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे सरकारने नुकसान भरपाई द्यावी.

**– रामराव इंगोले,**
**शेतकरी, अंजनगाव बारी**

# खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष नरेंद्र येवले यांचे निधन



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.16 )–** खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक नरेंद्र उर्फ बंडू पाटील येवले यांचे वयाच्या 61 व्या वर्षी दिर्घ आजाराने निधन झाले. अमरावती येथील खासगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मागिल काही महिन्यांपासून ते आजाराशी लढा देत होते. जिल्हा परिषदेचे माजी मुख्य लेखा-वित्त अधिकारी रवींद्र वसंतराव येवले यांचे धाकटे व तेजकुमार व. येवले सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी उप अभियंता तसेच धनेगाव येथील माजी सरपंच राजेंद्र वं.येवले यांचे मोठे बंधू होते. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील धनेगाव येथील येवले कुटूंबाला तालुक्याच्या राजकारणात मोठे स्थान आहे. नरेंद्र ऊर्फ बंडू पाटील यांनी वयाच्या 22 व्या वर्षापासून धनेगाव ग्रामपंचायत सरपंच पदापासून राजकारणास सुरवात केली होती. दिवंगत माजी आमदार संजय बंड यांचे ते कट्टर समर्थक होते. स्व.नरेंद्र ऊर्फ बंडू पाटील येवले यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा व विवाहित एक मुलगी आहे.त्याचे अंत्यसंस्कार धनेगाव येथील हिंदू स्मशानभूमी येथे पार पडली असुन तालुक्यातील राजकीय सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञानपाद्वारे कळविण्यात येते की, प्रकरणात अर्जदार कमला मारोतराव नांदणे रा. अंबाडा, ता. मोर्शी जि. अमरावती यांनी स्वतः चे जन्माची नोंद अंबाडा येथे करण्याकरीता निबंधक, ग्रा.पं. अंबाडा यांना आदेश मिळण्याबाबत या कार्यालया अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावाच्या असेल त्यांनी जाहीरनामा वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही व प्रकरणात पुढील कार्यावाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक :- २०.०८.२०२४

शिक्का

तहसीलदार, मोर्शी

## जाहीरनामा

ज्याअर्थी या महसुल न्यायालयात प्रकरण क्रमांक/ /13 (3), MRC-81/शिरजगांव कसबा/2024-25 प्रकरणात अर्जदार कु. अश्विनी वामनराव सातपुते रा. अंजनगांव सुर्जी ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने अर्जदार यांची नामे अश्विनी वामनराव सातपुते यांचा दि. 17/05/1989 रोजीची महाराष्ट्र जन्म/मृत्यूनोंदणी अधिनियम 1969 चे कलम 13 (3) नुसार जन्माची नोंद होणे बाबत गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय शिरजगांव कसबा ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचे विरूद्ध प्रकरण या कार्यालयात दाखल आहे.

त्याअर्थी, ज्या कोणास आक्षेप तथा हरकत घ्यावयाची असेल त्यांनी जाहिरात प्रसिद्धी दिनांकापासून 30 दिवसाच्या आत या कार्यालयात हरकत/आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहून दाखल करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांच्या तथा हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

महसुल नायब तहसीलदार,
चांदूर बाजार

## जाहीरनामा

ज्याअर्थी या महसुल न्यायालयात प्रकरण क्रमांक/ /13 (3), MRC-81/शिरजगांव कसबा/2024-25 प्रकरणात अर्जदार कु. साधना वामनराव सातपुते रा. काजळी ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने अर्जदार यांची नामे साधना वामनराव सातपुते यांचा दि. 17/06/1985 रोजीची महाराष्ट्र जन्म/मृत्यूनोंदणी अधिनियम 1969 चे कलम 13 (3) नुसार जन्माची नोंद होणे बाबत गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय शिरजगांव कसबा ता. चांदूर बाजार जि. अमरावती यांचे विरूद्ध प्रकरण या कार्यालयात दाखल आहे.

त्याअर्थी, ज्या कोणास आक्षेप तथा हरकत घ्यावयाची असेल त्यांनी जाहिरात प्रसिद्धी दिनांकापासून 30 दिवसाच्या आत या कार्यालयात हरकत/आक्षेप स्वतः किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहून दाखल करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांच्या तथा हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

महसुल नायब तहसीलदार,
चांदूर बाजार